MHCH090006172024

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | १९.०८.२०२४ |
| नोंद तारीख | : | १९.०८.२०२४ |
| निकाल तारीख | : | १०.०८.२०२६ |
| कालावधी | : | ०१व. ११म. २१दि. |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी गोंडपिपरी यांच्या न्यायालयात**
**( पिठासीन अधिकारी यु. पी. शिंदे)**

**नियमित फौजदारी खटला क्र. ८९/२०२४** **निशाणी क्र. १६**

| गुन्हा नोंद क्र. १३३/२०२४ | | |
|---|---|---|
| फिर्यादी / तक्रारदार | | महाराष्ट्र शासन मार्फत,<br>ठाणे अंमलदार<br>गोंडपिपरी पोलीस ठाणे,<br>ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर. |
| अभियोगपक्षातर्फे | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर. बी. धात्रक |
| आरोपी | | सुधाकर भाऊजी राऊत,<br>वयः ४४ वर्षे, धंदाः मजुरी,<br>रा. मातावार्ड, गोंडपिपरी, ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | श्री.पी.एस.आस्वले |

**भाग – ब**
(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १२.०४.२०२४ |
| फिर्याद दाखल दिनांक | १२.०४.२०२४ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | ३०.०९.२०२४ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | १३.०७.२०२६ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | १३.०७.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | १०.०८.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | --- |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुधाकर भाऊजी राऊत | फौ.प्र.सं.कलम ४१अ प्रमाणे नोटीस दिली. | सुचनापत्रावर सोडण्यात आले | भारतीय दंड संहिता कलम ३५४, ५०९, २९४, ५०४ व ५०६ प्रमाणे. | आरोपीला निर्दोष मुक्त करणेत आले. | | |

## भाग – क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोगपक्ष**

| सा. क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | वनमाला रमेश खेडेकर | फिर्यादी | १५ |

**ब. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ०१ | दोषारोपपत्र |

## न्यायनिर्णय

(दिनांक १० ऑगस्ट, २०२६ रोजी पारीत)

प्रस्तुतचा खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३५४, ५०९, २९४, ५०४ व ५०६ अन्वये असलेला दोषारोप सिध्दतेसाठी चालविण्यात आले आहे.

**<u>अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u>**

२. दि. १२.०४.२०२४ रोजी रात्री ८ वाजताचे दरम्यान मौजा मातावार्ड, गोंडपिपरी येथे फिर्यादी तिचे घरासमोर उभी होती. तेव्हा तिचे वार्डातील आरोपी सुधाकर राऊत हा दारु पिऊन फिर्यादीचे जवळ आला व मला भात दे असे म्हणाला असता "मी तुला भात देत नाही, माझ्या घरी कोणी माणुस नाही, तुझा माझा काही संबंध नाही" असे फिर्यादी आरोपीला म्हणाली. तेव्हा आरोपीने फिर्यादीचा हात पकडून "तुझी जागा होय का तुझ्या मायेची पुदी" असे फिर्यादीला लज्जा वाटेल अश्या अश्लील शब्दात शिवीगाळ करुन फिर्यादीसोबत झगडा भांडण केले. तेव्हा फिर्यादीचे पती हे त्यांचे मालक हारुण अली सय्यद यांचे सोबत घरी आले. तेव्हा आरोपीने फिर्यादीचा हात सोडून दिला व शिवीगाळ करुन तु मार्केट मध्ये भेट तुला कापुन फेकतो असे म्हणून धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने पोलीस ठाण्यात जाऊन आरोपीविरुध्द फिर्याद दिली.

३. सदर फिर्यादी वरुन गु.र.क्र. १३३/२०२४ भारतीय दंड संहिता कलम ३५४, ५०९, २९४, ५०४ व ५०६ अन्वये दाखल करण्यात आला. गुन्हयाचा तपास श्री. देवाजी अन्नाजी सुरपाम, पोलीस हवालदार यांच्याकडे देण्यात आला. त्यांनी तपासादरम्यान आरोपीला नोटीस दिली. घटनास्थळी जावुन घटनास्थळाचा पंचनामा केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. आरोपीविरुध्द पुरावा गोळा झाल्याने दोषारोप पत्र दाखल केले.

४. माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीवर निशाणी ११ वर भा.द.वि. ३५४, ५०९, २९४, ५०४ व ५०६ प्रमाणे दोषारोप ठेवण्यात आलेला आहे. सदरचा दोषारोप आरोपीला त्याच्या बोलीभाषेमध्ये समजावुन सांगण्यात आला. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे सांगुन खटला पुढे चालविण्याची विनंती केली.

५. संपरिक्षेदरम्यान अभियोग पक्षातर्फे सरकारी फिर्यादी सा. क्र. १ वनमाला रमेश खेडेकर (नि.१५) यांची साक्ष नोंदवण्यात आली. सदर साक्षीदारांनी अभियोग पक्षाच्या कथनास पुष्टी देणारी साक्ष न दिल्याने तपास अधिकारी किंवा इतर साक्षीदारांची साक्ष

नोंदविण्यात आली नाही. प्रस्तुत प्रकरणातील उपलब्ध पुराव्याचे स्वरुप तसेच फिर्यादी व आरोपी यांनी तडजोडीद्वारे आपसात प्रकरण मिटविल्याची बाब विचारात घेऊन तसा नि.क्र.१ खाली आदेश पारीत करण्यात आला.

६. आरोपीविरुध्द पुरावा न आल्यामुळे आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये जबाब नोंदविण्यात आलेला नाही.

७. प्रस्तुत खटल्यात अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर. बी. धात्रक व आरोपीचे विधीज्ञ श्री. पी. एस. आस्वले यांचा युक्तीवाद ऐकला.

८. अभियोग पक्षाचा लेखी व तोंडी पुरावा, युक्तीवाद तसेच आरोपींच्या विधिज्ञांचा युक्तिवाद विचारात घेऊन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे ते येणेप्रमाणे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि. १२.०४.२०२४ रोजी रात्री २०.०० ते २०.३० वा. चे सुमारास मौजे मातावार्ड, गोंडपिपरी, ता. गोंडपिपरी येथे फिर्यादी तिच्या घरासमोर उभी असताना आरोपीने फिर्यादीचा हात पकडून "तुझी जागा होय का तुझ्या मायेची पुदी” असे तिला लज्ञा वाटेल अश्या अश्लील भाषेत शिवीगाळ करुन तिचा विनयभंग केला हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का? | नाही. |
| २. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीच्या विनयाचा अपमान करण्याच्या उद्देशाने तिचा हात पकडून "तुझी जागा होय का तुझ्या मायेची पुदी” असे असे फिर्यादीस मनाला वाईट वाटून तिला लज्ञा येईल असे अश्लील शब्द वापरले हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | नाही. |
| ३. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस उपरोक्त | |

| | | |
|---|---|---|
| | अश्लील भाषेत शिवीगाळ केली हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | नाही. |
| ४. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करुन अपमानीत केले व त्याद्वारे सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास प्रवृत्त केले हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | नाही. |
| ५. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला व तिच्या पतीला मारण्याची धमकी दिली हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | नाही. |
| ६. | आदेश काय? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दा क्र.१ ते ५ साठी</u> :

९. उपरोक्त सर्व मुद्दे हे ऐकमेकांशी संबंधित असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीतपणे चर्चेकरिता घेतले आहेत.

१०. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी ''घटनेच्या दिवशी व वेळी आरोपीने फिर्यादीच्या विनयाचा अपमान करण्याच्या उद्देशाने फिर्यादीला "तुझी जागा होय का तुझ्या मायेची पुदी” असे तिला लज्ञा वाटेल अश्या अश्लील भाषेत शिवीगाळ करुन तिचा विनयभंग केला व तिला शिवीगाळ करुन अपमानीत केले तसेच, तिला व तिच्या पतीला मारण्याची धमकी दिली'' हे सिध्द केले आहे किंवा कसे हे पाहणे अत्यंत गरजेचे आहे.

११. अभियोग पक्षाचा पुरावा नोंदविण्यापूर्वी यातील उभय पक्षांनी प्रस्तुत प्रकरण आपसात तडजोड करण्याकरिता संयुक्त परवानगी अर्ज (नि.१३) दाखल करून त्याअन्वये

प्रकरण तडजोड करण्याची विनंती केली. सदरचा खटला हा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३२० नुसार तडजोडपात्र नसल्यामुळे तडजोडीची परवानगी नाकारण्यात आली आहे. उभय पक्षांनी प्रस्तुत प्रकरण त्यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर समोपचाराने मिटले असल्याबाबत संयुक्त तडजोड पुरसिस (नि.१४) दाखल केली आहे.

१२. अभियोग पक्षाने आरोपीवरील आरोप सिध्द करण्याकरिता फिर्यादी सा.क्र.१ वनमाला हीची साक्ष नोंदविली. तिने तिच्या साक्षीत असे कथन केले आहे की, आरोपी हा त्यांच्या वार्डमध्ये राहतो. दोन वर्षापुर्वी आरोपी हा दारु पिऊन त्यांच्या घरी आला होता म्हणून त्यांनी रागाच्या भरात पोलीस स्टेशनला जाऊन तक्रार दिली. परंतु तक्रारमधील मजकूर माहित नसल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदार ही प्रकरणास सुसंगत साक्ष देत नसल्याने त्याला भारतीय पुरावा अधिनियमाचे कलम १५४ प्रमाणे सूचक प्रश्न विचारण्यात आले. त्यामध्ये साक्षीदाराने आरोपी व तिच्यामध्ये समझोता झाल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे आरोपीला गुन्हयामध्ये गोवण्याइतपत पुरावा अभियोगपक्षाला अभिलेखावर आणता आलेला नाही.

१३. फिर्यादी व आरोपी यांनी मिळुन न्यायालयात पुरसीस (नि.१४) द्वारे कळविले की, त्यांनी तडजोड केली आहे. पंरतु प्रस्तुत प्रकरणातील गुन्हा फौजदारी प्रकिया संहिता कलम ३२० (१)(२) मध्ये आपसात मिटविण्यासारखे नसल्यामुळे फिर्यादी व आरोपी दरम्यान झालेल्या तडजोडीला कायदेशीर मान्यता व परवानगी देण्यात आली नाही. फिर्यादीने हे मान्य केले आहे की, त्यांनी आरोपी सोबत प्रकरण आपसात मिटवलेले आहे, याच कारणामुळे सरकारी अभियोक्ता किंवा अभियोग पक्षाने पुढे कोणतेही साक्षीदार तपासले नाही.

१४. साक्षीदारांनी दिलेल्या मौखिक साक्षीचे अवलोकन केले असता साक्षीदार क्र.१ ने आरोपीविरुध्द फिर्याद दिली होती, असे पुराव्यामध्ये कथन केले आहे. फिर्यादीने कथन केल्याप्रमाणे व तडजोड पुरसिस (नि.१४) प्रमाणे आरोपीसोबत त्यांचा समझोता झाल्याचे देखील मान्य केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात समझोता झालेला असल्याने

अभियोगपक्षाने देखील प्रस्तुत साक्षीदारां व्यतिरीक्त इतर साक्षिदारांची साक्ष नोंदविलेली नाही. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द होण्याइतपत पुरावा न्यायालया समोर आलेला नाही. त्यामुळे उपलब्ध असलेल्या साक्षी पुराव्यावरून घटनेच्या दिवशी व वेळी आरोपीने फिर्यादीच्या विनयाचा अपमान करण्याच्या उद्देशाने फिर्यादीला "तुझी जागा होय का तुझ्या मायेची पुदी” असे तिला लज्जा वाटेल अश्या अश्लील भाषेत शिवीगाळ करुन तिचा विनयभंग केला व तिला शिवीगाळ करुन अपमानीत केले तसेच, तिला व तिच्या पतीला मारण्याची धमकी दिली हे आवश्यक घटक सर्व शंकांच्या पलीकडे जाऊन सिध्द करण्यास अभियोगपक्ष अपयशी ठरला आहे. सबब, उपलब्ध असलेल्या पुराव्याआधारे तसेच उभय पक्षांमधील झालेला समझोता या बाबींचा विचार करता आरोपी विरोधात निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दे क्र. १ ते ५ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहेत.

**<u>मुद्दा क्र.६ :-</u>**

१५. वर मुद्दा क्र. १ ते ५ मध्ये कथन केलेल्या कारणास्तव आरोपी निर्दोष होण्यास पात्र आहे. आरोपीने फौजदारी प्रकिया संहिता कलम ४३७-अ प्रमाणे अपिल न्यायालयासमोर उपस्थित होण्यासाठी पुढील सहा महिन्याकरीता प्रतीभुतीसह वैयक्तीक बंधपत्र पत्र देण्याचे निर्देश देण्यात येत आहे. अंततः मी मुद्दा क्रमांक ६ च्या उत्तरात आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे असे म्हणुन पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी सुधाकर भाऊजी राऊत रा. मातावार्ड, गोंडपिपरी, ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर यास भारतीय दंड विधान कलम ३५४, ५०९, २९४, ५०४ व ५०६ प्रमाणे असलेल्या अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीची बंधपत्र व जमानत पत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७-अ प्रमाणे अपिल

न्यायालयासमोर उपस्थीत होण्यासाठी पुढील सहा महिन्याकरीता रक्कम रुपये १५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र दयावे.

(खुल्या न्यायालयामध्ये आदेशीत व उद्घघोषित.)

(Sd-)
(यु. पी. शिंदे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
गोंडपिपरी.

ठिकाण :- गोंडपिपरी.
दिनांक :- १०.०८.२०२६.

## **<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द-नि-शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : उमेश रामप्रसाद आमटे |
| न्यायालयाचे नाव | : दिवाणी व फौजदारी न्यायालय, गोंडपिपरी |
| न्यायनिर्णयाची तारीख | : १०.०८.२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : १०.०८.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : १०.०८.२०२६ |